# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./३९९५/२०२१ दि.१४/०१/२०२१

## परिपत्रक

विषय :- ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका २०२०-२०२१.
राज्यातील ३४ जिल्ह्यांतील सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि.१५/०१/२०२१ व दि. २०/०१/२०२१ रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर करणे/सवलत देण्याबाबत.

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेश क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.-०१/का-०८, दि. ०४/०१/२०२१.

विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, राज्य निवडणुक आयोगाच्या संदर्भिय आदेशानुसार राज्यातील ३४ जिल्ह्यांतील सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झालेला आहे. त्याकरीता संदर्भिय आयोगाच्या आदेशानुसार उक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांनी कार्यवाही घ्यावी. आयोगाच्या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सोबत:- उक्त संदर्भिय आदेश.

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख/युनिट प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. सदरहू परीपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
४. मा. प्राचार्य, संलग्नित सर्व महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस्तव.
६. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिल्हारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

निवडणूक प्राथम्य

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र.०१/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०४/०१/२०२१

प्रति,
मा. प्रधान सचिव,
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,
मुंबई-४०० ०३२.

विषय:- ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका २०२०-२०२१.
राज्यातील ३४ जिल्ह्यांतील सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि. १५/०१/२०२१ व दि. २०/०१/२०२१ रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर करणे/सवलत देण्याबाबत.
संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दि. ११/१२/२०२० व दि. १६/१२/२०२० रोजीचे निवडणूक कार्यक्रमाबाबतचे आदेश.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने उक्त संदर्भीय आदेशांद्वारे (प्रती संलग्न) राज्यातील ३४ जिल्ह्यांतील सुमारे १४२३४ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. यानुसार मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये शुक्रवार दिनांक १५/०१/२०२१ रोजी मतदान होणार आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी, मुलचेरा, अहेरी, एटापल्ली, भामरागड व सिरोंचा या सहा तालुक्यांमध्ये बुधवार दिनांक २०/०१/२०२१ रोजी मतदान होणार आहे.

२. उपरोक्त ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणेच सर्व दक्षता व काळजी घेणे क्रमप्राप्त आहे.

३. तसेच ग्रामपंचायतींच्या निवडणुका या अत्यंत चुरशीच्या लढविल्या जात असून अल्प मताने उमेदवार विजयी होत असतात.

४. वरील कार्यक्रमांतर्गत सार्वत्रिक निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींपैकी नागरी क्षेत्राच्या (विशेषत: महानगरपालिका क्षेत्राच्या) लगतच्या मोठ्या ग्रामपंचायतींमध्ये राहणारे बहुतांश मतदार हे कामधंद्याकरीता नागरी क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमाच्या आस्थापना, दुकाने, औद्योगिक

आस्थापना (MIDC) इत्यादी ठिकाणी ये-जा करीत असल्याने अशा मतदारांना उक्त मतदानाच्या दिनांकास मतदान करता यावे यासाठी विशेष रजा दिल्यास, निवडणुक मतदानाची टक्केवारी निश्चितपणे वाढू शकेल. ही वस्तुस्थिती लक्षात घेता राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

अ) उपरोक्त निवडणूक कार्यक्रमानुसार **संबंधित निवडणूक क्षेत्रातील** सर्व दुकाने, आस्थापना, निवासी हॉटेल्स, खाद्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना यामधील कामगारांना मतदानाच्या दिवशी (दि. १५/०१/२०२१ व दि. २०/०१/२०२१) मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी जाहीर करावी.

ब) निवडणूक होणाऱ्या ज्या ग्रामपंचायतींच्या लगतच्या क्षेत्रात औद्योगिक वसाहती (MIDC) तसेच महानगरपालिकेसारख्या मोठ्या नागरी वसाहती वसलेल्या आहेत, अशा ठिकाणी नोकरी निमित्ताने **कामास येणाऱ्या संबंधित ग्रामपंचायतींमधील मतदारांना** मतदानाचा हक्क बजावता यावा याद्दष्टीने अशा मतदारांना उक्त नमूद केलेल्या मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी / विशेष सवलत देण्यात यावी.

क) **शहरी भागात किंवा निवडणुका नसलेल्या भागातील दुकाने/कंपन्या/वाणिज्यीक आस्थापना बंद ठेवण्याची आवश्यकता नाही.**

५. उपरोक्त आदेशाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपल्या स्तरावर योग्य ती अधिसूचना/परिपत्रक निर्गमित करण्यात याव्यात. आपले परिपत्रकामध्ये "आयोगाच्या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात येईल" असे स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

६. या आदेशाच्या प्रभावी अंमलबजावणीची सर्व जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशानुसार.

आपला,

(अविनाश सणस)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून) यांना माहितीस्तव.